# प्रकरण तिसरे

# प्रकरण ३
# तथ्य पृथक्करण आणि स्पष्टीकरण

## ३.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची पूर्ण माहिती जसे अन्नधान्याचे वितरण, दर्जा, वस्तूंची किंमत, रेशन धान्य दुकानाचे व्यवस्थापन इ. माहिती प्राथमिक स्तरावर जाऊन घेतली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या स्थानांच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेची रुपरेषा या प्रकरणात स्पष्ट केली आहे. या माहितीचे विश्लेषण विविध सांख्यिकी तंत्र वापरून केले आहे.

कागल तालुक्यातील सर्व परिस्थिती पहाता सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार होणेस अर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गासाठी मोठी गरज आहे. मात्र राजकीय गटाचा हस्तक्षेप, भष्टाचार व रेशन दुकानांचे अकार्यक्षम व्यवस्थापन या गोष्टी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या विस्तारास अडसर ठरत आहेत. याचा परिणाम समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गावर झालेला दिसतो. म्हणून रेशन धान्य दुकाने व कार्डधारक यांच्या वास्तव परिस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. प्रस्तुत अभ्यासाचा उपयोग आपल्या रेशन दुकानाचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि कार्डधारकांच्या विकासाकरिता होईल. या प्रकरणात कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या सत्य परिस्थितीचा आढावा सांख्यिकी माहितीच्या आधारावर घेतला आहे.

## ३.२ सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अन्य महामंडळाचे कार्य

भारतीय अन्न महामडंळाची स्थापना सन १९६५ मध्ये झाली. हे महामंडळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेला अन्नधान्याचा पुरवठा करणारे महत्वाचे मंडळ आहे. या महामंडळाचे महत्वाचे कार्य म्हणजे अन्नधान्याची खरेदी,

आणि ज्यावेळी किंमती वाढण्याची शक्यता असते त्यावेळी महामंडळ योग्य दराने आपल्याकडील अन्नधान्य विक्रीस काढते. त्यामुळे किंमतीवर नियत्रंण रहाते. म्हणून बफर स्टॉक हे शेतीमालाच्या किंमती नियंत्रित ठेवण्याचे महत्वाचे साधन आहे.

एकूण सार्वजनिक वितरण व्यवस्थेची व सार्वजनिक वितरणातील भारतीय अन्न महामडंळ व इतर महामंडळे या सर्व घटकांची अन्नधान्य व इतर आवश्यक वस्तू यांच्या वितरणातील रुपरेषेचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, केंद्रापासून स्थानिक पातळीपर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये परिवर्तन करणे व ती कार्यक्षम करणे आवश्यक वाटते. त्यासाठी कागल तालुक्यातील रेशनिंग दुकानाद्वारे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा अभ्यासणे आवश्यक होते. यासाठी कार्डधारकांची संपूर्ण पार्श्वभूमी विचारात घेतली आहे आणि त्याप्रमाणे विश्लेषण केले आहे.

## तक्ता ३.१ : कागल तालुक्यातील निवडलेल्या क्षेत्रातील कार्डधारकांचे प्रकार व प्रमाण

(आकड्यात)

| अ. क्र. | कार्डाचा प्रकार | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शुभ्र | ०४ | ०४ |
| २. | केशरी (APL) | ५२ | ५२ |
| ३. | पिवळे (BPL) | ४० | ४० |
| ४. | अंत्योदय | ०४ | ०४ |
| एकूण | | १०० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील तक्त्यामध्ये कागल तालुक्यातील रेशनिंग धान्य दुकानांचा विशेष अभ्यास करणेसाठी बामणी, सिद्धनेर्ली, व्हन्नाळी, केबंळी, शंकरवाडी, क. सांगाव, मौ. सांगाव, वंदूर व बाचणी अशी १० गावे निवडण्यात आली होती. प्रत्येक गावातील १० कार्डधारक निवडण्यात आले होते. यानुसार संशोधनासाठी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

५. अन्नपूर्णा योजना :

ज्या व्यक्तिचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त आहे व त्यांचा सांभाळ करणेसाठी कोणीही नसेल म्हणजेच त्या निराधार आहेत अशा व्यक्तिंना सार्वजनिक वितरणातून १० किलो धान्य अंत्योदय योजनेतून मोफत दिले जाते. अशा लोकांची या योजनेसाठी ग्रामपंचायतीच्या ठरावातून निवड केली जाते.

## ३.३ व्यवसायानुसार विभागणी

कागल तालुक्याच्या विकासाच्यसा प्रक्रियेत विविध क्षेत्रे महत्वाची कार्य करत आहेत. यामुळे कार्डधारक हा कोणता व्यवसाय करतो, त्याच्या उत्पन्नाचा स्त्रोत कोणता आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. हे पुढील कोष्टकात दाखविण्यात आले आहे.

**तक्ता ३.२**
**कार्डधारकाचा व्यवसाय**

| अ.क्र. | उत्पन्नाचा स्त्रोत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | रोजगार | १२ | १२ |
| २. | शेती | ६५ | ६५ |
| ३. | इतर व्यवसाय | ११ | ११ |
| ४. | नोकरी | ०२ | ०२ |
| ५. | घरकाम | १० | १० |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील तक्त्यात कागल तालुक्यात शेती व्यवसायात गुंतलेले कार्डधारक अधिक आहेत असे दिसते. त्यांचे प्रमाण ६५ टक्के त्याच्या खालोखाल मजुरी/रोजगार करण्याऱ्या कार्डधारकांची संख्या १२ टक्के आहे. तसेच इतर व्यवसाय करणाऱ्या कार्डधारकांची संख्या ११ टक्के आहे. यामध्ये दुकाने, दुग्धव्यवसाय, तसेच इतर छोट्या मोठ्या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तिंचा

## तक्ता ३.४


## कागल तालुक्यातील कार्डधारकांचे वार्षिक उत्पन्न

| उत्पन्न रु. | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| १०००० पेक्षा कमी | ६३ | ६३ |
| १०००० ते २०००० | २६ | २६ |
| २०००० ते ३०००० | ३ | ३ |
| ३०००० ते ४०००० | १ | १ |
| ४०००० पेक्षा जास्त | ६ | ६ |
| **एकूण** | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील तक्त्याप्रमाणे १०००० पेक्षा कमी उत्पन्न गटातील ६३ टक्के कार्डधारक आहेत. तसेच १०००० ते २०००० रु उत्पन्न गटातील २६ टक्के कार्डधारक दिसतात. यावरून १०००० पेक्षा कमी उत्पन्न गटातील व्यक्तिंची संख्या अधिक आहे. अर्थात कार्डधारकांची सांपत्तीक स्थिती म्हणावी तितकी चांगली नाही त्यामुळे रहाणीमानाचा दर्जा खालावलेला आहे असे दिसते.

### आकृती क्र. ३.१
### कागल तालुक्यातील कार्डधारकांचे वार्षिक उत्पन्न



वरील तक्त्याप्रमाणे १ ते ५ पर्यंत व्यक्तिंची संख्या असणारी कुटुंबे कागल तालुक्यातील संशोधन क्षेत्रात ८३ टक्के आढळून आली तर ५ ते १० व्यक्ती असणारी कुटुंबे १६ टक्के आढळून आली. १५ ते २० व्यक्ती असणारे १ कुटुंब आढळून आले. यावरून असे दिसून येते की, १ ते ५ व्यक्ती असणारी कुटुंबे अधिक आहेत. अर्थात विभक्त कुटुंबाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

## ३.७ शेतजमीन मालकी व प्रकार

शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती असणे म्हणजे प्रतिष्ठा समजली जाते. तर शेतीमुळे उदरनिर्वाह चालतो. जर शेती पाण्याखालील असेल तर उत्पन्न अधिक मिळते आणि कुटुंबाचे रहाणीमानाचा दर्जा सुधारतो. मात्र शेती जिरायत असेल तर उत्पादन कमी आणि उत्पादन खर्च जास्त होतो. त्यामुळे कागल तालुक्यातील कार्डधारकांची शेती आहे की नाही व असेल तर बागायत किती व जिरायत किती हे पहाणे महत्वाचे आहे. म्हणून खालील कोष्टकाच्या आधारे ते दर्शविले आहे.

### तक्ता ३.६
### कार्डधारकांच्या जिरायत शेतीचे वर्गिकरण

| जमीन (एकरमध्ये) | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| ० | ५१ | ५१ |
| ० ते १ | ३७ | ३७ |
| १ ते २ | १० | १० |
| २ ते ४ | १ | १ |
| ४ ते ६ | १ | १ |
| **एकूण** | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

## तक्ता ३.८

## कार्डधारकांच्या रेशन कार्ड वापराबाबत माहिती

| उत्तर | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ९१ | ९१ |
| नाही | ०९ | ०९ |
| **एकूण** | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील कोष्टकानुसार ९१ टक्के कार्डधारक हे आपले कार्ड स्वत:साठीच वापरत हाते असे आढळून आले आहे. या कार्डधारकांना गहू, तांदूळ, रॉकेल व पामतेल या चार महत्वाच्या वस्तू कार्डावर मिळतात. तर ९ टक्के लोक हे रेशन दुकानातून मिळणारे धान्य बरोबर नसते या कारणाने आपले कार्ड दुसऱ्याला देतात व आपण बाजारातून धान्य आणून खातात असे आढळून आले.

## ३.९ उच्च उत्पन्न गटातील दारिद्र्य रेषेखालील कार्ड उपभोक्ते

सार्वजनिक वितरण व्यवस्थेत आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला अन्नधान्य व आवश्यक वस्तूंचा पुरवठा कमी किंमतीत करून अशा व्यक्तिंच्या रहाणीमानाचा दर्जा वाढविणे व दारिद्र्य कमी करणे यासाठी प्रयत्न केला जातो. या व्यक्तिंना पिवळे कार्ड देऊन अन्नधान्य कमी किंमतीत पुरविले जाते. मात्र ही दारिद्र्याची कार्डे दारिद्र्यरेषेखालील व्यक्तिंनाच मिळतात काय हे पहाणे जरूरी आहे.

येते की दुबार रेशनकार्ड काढणेस साधारणपणे ३ महिने लागतात. यावरून कागल तालुक्यतील धान्य वितरण व्यवस्थापनात दिरंगाई आहे असे दिसते.

**तक्ता ३.१०**
**नविन रेशन कार्ड/दुबार रेशन कार्ड**
**मिळणेसाठी लागणाऱ्या कालावधीचे वर्णन**

| कालावधी | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| सांगू शकत नाही | ६४ | ६४ |
| १-२ महिने | ०७ | ०७ |
| २-३ महिने | २८ | २८ |
| ३-४ महिने | ०१ | ०१ |
| **एकूण** | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

## ३.११ रेशन दुकानातून कार्डधारकांना होणारा पुरवठा व प्रमाण

विविध प्रकारच्या कार्डधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत होणारा आवश्यक वस्तूंचा पुरवठा विचारात घेणे महत्वाचे आहे. कारण आवश्यक वस्तूंचा पुरवठा कार्डधारकांना योग्य व नियमितपणे करणे हे रेशन धान्य दुकानदारांचे महत्वाचे कार्य आहे. म्हणून कागल तालुक्यातील रेशन दुकानातून कोणकोणत्या वस्तू किती व कोणत्या प्रमाणात तसेच कोणत्या दराने पुरविल्या जातात हे पहाणे आवश्यक आहे. खालील तक्त्याद्वारे विविध वस्तूचा पुरवठा सर्व प्रकारच्या कार्डधारकांना रेशन दुकानाकडून कसा होतो हे दाखविण्यात आले आहे.

## तक्ता ३.१२

## रेशन दुकानातून मिळणारे तांदळाचे प्रमाण

| अ. क्र. | तांदूळ (किलो) | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मिळत नाही | ५५ | ५५ |
| २. | १–५ | ०५ | ०५ |
| ३. | ५–१० | १२ | १२ |
| ४. | १०–१५ | २४ | २४ |
| ५. | १५–२० | ०४ | ०४ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील कोष्टकानुसार ५५ कार्डधारकांना तांदूळ मिळत नाही असे आढळून आले. यामध्ये साधारण केशरी व शुभ्र कार्डधारकाचा समावेश दिसून येतो. तर ५ किलो पर्यंत तांदुळ मिळणारे कार्डधारक ५ टक्के आहेत. यामध्ये केशरी कर्डधारक दिसून येतात. १० ते १५ किलो तांदूळ मिळणारे २४ कार्डधारक दिसून येतात. यामध्ये पिवळ्या कार्डधारकांचा समावेश होतो. तर १५ ते २० किलो तांदूळ मिळणारे ४ टक्के कार्डधारक असून हे अंत्योदय योजनेतील कार्डधारक आहेत. यावरून असे दिसून येते की केशरी कार्डधारकांना उपलब्ध कोट्यानुसार वाटप केले जाते. त्यामुळे त्यांना तांदळाचा कोटा उपलब्ध नाही असे सांगून तांदूळ दिला जात नाही आणि दिलाच तर काही केशरी कार्डधारकांना ५ किलोच्या प्रमाणात दिला जातो. तसेच पिवळ्या कार्डधारकांना मंजूर तांदूळ प्रति कार्ड १५ किलो आहे. मात्र हा तांदूळ काही ठिकाणी १५ किलो नियमाप्रमाणे दिला जातो. मात्र काही ठिकाणी यामध्ये कमी प्रमाण करून १० ते १४ किलो यामध्ये केला जातो. तर अंत्योदय योजनेतही मंजूर तांदळापेक्षा कमी किलो तांदूळ दिला जातो असे आढळून आले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ३.१२ रेशन दुकानामार्फत आकारला जाणारा दर

कागल तालुक्यातील रेशन दुकानामार्फत वेगवेगळ्या प्रकाराच्या कार्डधारकांना पुरविल्या जाणाऱ्या अन्नधान्यासाठी आकारला जाणारा दर खालील कोष्टकात दाखविला आहे.

**तक्ता ३.१४ (अ)**
**केशरी कार्डधारकांना आकारला जाणारा दर**

| अ.क्र. | वस्तू | दर रु. प्रति किलो |
|---|---|---|
| १. | गहू | ७.०० |
| २. | तांदूळ | ९.५० |
| ३. | रॉकेल | ९.५८ |
| ४. | पामतेल | ४२.०० |


**तक्ता ३.१४ (ब)**
**पिवळ्या कार्डधारकांना आकारला जाणारा दर**

| अ.क्र. | वस्तू | दर रु. प्रति किलो |
|---|---|---|
| १. | गहू | ५.०० |
| २. | तांदूळ | ६.०० |
| ३. | रॉकेल | ९.५८ |
| ४. | पामतेल | ४२.०० |

**तक्ता ३.१४ (क)**
**अंत्योदय योजनेच्या कार्डधारकांना आकारला जाणारा दर**

| अ.क्र. | वस्तू | दर रु. प्रति किलो |
|---|---|---|
| १. | गहू | २.०० |
| २. | तांदूळ | ३.०० |
| ३. | रॉकेल | ९.५८ |
| ४. | पमतेल | ४२.०० |

पुरवठा होतो असे दिसून येते. त्यामुळे जास्तितजास्त कार्डधारक असमाधानी आहेत. याचे कारण म्हणजे रेशन धान्य दुकानाला दरमहा ठराविक कोठा प्राप्त होत नाही. त्यामुळे वितरणाचे प्रमाण व दिवस यामध्ये वरचेवर बदल होत असतात.




## ३.१४ रेशन दुकानामार्फत मिळणाऱ्या अन्नधान्याचा दर्जा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाटप केले जाणारे धान्य चांगल्या दर्जाचे आहे कि कनिष्ठ दर्जाचे आहे हे जाणून घेणे आवश्यक होते. खालील तक्त्यामध्ये ही माहिती दाखविली आहे.

**तक्ता ३.१६**

**रेशन दुकानात मिळणाऱ्या धान्याचा दर्जा**

| अ. क्र. | दर्जा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | चांगला | ३१ | ३१ |
| २. | कनिष्ठ | ६९ | ६९ |
| एकूण | | १०० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती

तालुक्यातील भ्रष्टाचार, गैरवर्तन याबाबतची संशोधनासाठी निवडलेल्या क्षेत्रातील माहिती दाखविली आहे.

### तक्ता ३.१७
### कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेत भ्रष्टाचार/गैरवर्तन वर्गिकरण

| अ. क्र. | उत्तर | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय/होतो | ५२ | ५२ |
| २. | नाही | ४८ | ४८ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील तक्त्यानुसार कागल तालुक्यातील निवडलेल्या क्षेत्रातील निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे ५२ टक्के कार्डधारकाच्या बाबतीत भ्रष्टाचार/गैरवर्तन होते असे आढळून आले. तर ४८ टक्के कार्डधारकांच्या बाबतीत असे प्रकार घडून न आलेचे दिसून आले. मात्र तक्त्याचा विचार केला असता सार्वजनिक वितरणात निवडलेल्या क्षेत्रात काही प्रमाणात भ्रष्टाचार, घोटाळे, गैरवर्तन, तसेच व्यक्ती व्यक्तीत फारकत करून धान्य वाटप केले जाते असे आढळून आले आहे. त्यामुळे कागल तालुक्यातील वितरण व्यवस्था चांगल्या प्रकारे काम करते असे दिसून येत नाही. अर्थात अर्थव्यवस्थेतील आर्थिक कमकुवत/गरीब व्यक्तिंच्या रहाणीमानात वाढ करण्येच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या उद्दीष्टांमध्ये अडथळे येत असल्याचे दिसून येते.

## ३.१६ सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षम होण्यास उपाययोजना

देशातील गरीब जनतेचे महागाई पासून संरक्षण करणे, आर्थिक कल्याण साधने, दारिद्र्य कमी करणे आणि एकूण अर्थिक विकास साधने व देशाची अर्थव्यवस्था भक्कम करणे हा उद्देश सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत साध्य

अभ्यासात कार्डधारकाने फक्त एकच उपाययोजना सुचवावी असे सांगीतले होते. त्याप्रमाणे सूचनांचे वर्गिकरण केले आहे. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षम होणेस व्यस्थापन चांगले व समन्वय असावा असे ३० टक्के कार्डधारकाकडून आढळून आले. त्या खालोखाल कडक नियंत्रण ठेवावे असे २० टक्के कार्डधारकांचे मत दिसते. तर १० टक्के कार्डधारकांचे वस्तूंचा पुरवठा वाढवावा असे दिसून येते. तर १३ टक्के कार्डधारकांनी उत्तर देण्याचे टाळले आहे, ८ टक्के कार्डधारकांच्या बाबतीत इतरही वस्तूंचा पुरवठा वाढवावा असे मत आहे. तर कार्डधारकांची संघटना असावी असे मत ३ टक्के कार्डधारकांनी मांडले आहे. तसेच वेळेवर धान्य पुरवावे, रेशन दुकानांची संख्या वाढवावी, भ्रष्टाचाराविरूद्ध कडक कारवाई केली जावी असे प्रत्येकी ३ टक्के कार्डधारकांचे मत आहे. १ टक्के कार्डधारकांना वाटपात विकेंद्रीकरण करावे असे वाटते, तर बचत गटामार्फत रेशन दुकाने चालवावीत, धान्याच्या किंमती व प्रमाण जाहिर केले जावे, या यंत्रणेमध्ये सरकारने विशेष लक्ष द्यावे, धान्याऐवजी पैसे मिळावेत, चांगल्या दर्जाचे अन्नधान्य मिळावे अशी मते प्रत्येकी १ टक्के कार्डधारकांनी नोंदविलेली आहेत. यावरून ८३ टक्के कार्डधारकांनी स्वस्त धान्य दुकानाबाबत तक्रार केली आहे असे दिसते.

## ३.१७ कार्डधारकांच्या संख्येप्रमाणे दुकानांचे वर्गिकरण

देशातील कमकुवत/गरीब लोकांची उपासमारीपासून व कुपोषणापासून सुटका करणेसाठी व देशातील अर्थव्यवस्थेत मानवी भांडवलाला कार्यक्षम ठेवण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था महत्वाची भूमिका पार पाडत असते. हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे उद्दीष्ट वितरणातील सर्व घटकाकडून व्यवस्थित पार पाडले जाते की नाही हे पहाणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर काम करणारे घटक म्हणजे स्वस्त धान्य दुकान/रेशन धान्य दुकान या घटकाचा कार्डधारकाशी प्रत्यक्ष संबंध येत असतो. खालील तक्त्याद्वारे प्रति रेशन धान्य दुकानात कार्डधारकांची संख्या किती आहे हे दाखविले आहे.

तक्त्याच्या आधारे कागल तालुक्यातील निवडलेल्या क्षेत्रातील रेशन धान्य दुकानांच्या व्यवस्थापकांचे उत्पन्न दाखविण्यात आलेले आहे.

**तक्ता ३.२०**
**कागल तालुक्यातील रेशन दुकान व्यवस्थापकांचे वार्षिक उत्पन्न (२००७-०८)**

| अ. क्र. | उत्पन्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १०००० पर्यंत | ०१ | १० |
| २. | १००००-१५००० | ०१ | १० |
| ३. | १५०००-२०००० | ०३ | ३० |
| ४. | २०००० पेक्षा अधिक | ०५ | ५० |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील तक्ता कागल तालुक्यातील रेशन धान्य दुकान व्यवस्थापकांचे वार्षिक उत्पन्न दाखवितो. रुपये १०००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे १० टक्के रेशन दुकान व्यवस्थापक आहेत. रुपये १०००० ते १५००० उत्पन्न असणाऱ्यांची संख्या १० टक्के आहे, रुपये १५००० ते २०००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांची संख्या ३० टक्के तर रुपये २०००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ५० टक्के आहे. यावरून कागल तालुक्यातील ५० टक्के रेशन धान्य दुकान व्यवस्थापकांची आर्थिक स्थिती भक्कम आहे. तसेच ५० टक्के व्यवस्थापकांचे उत्पन्न हे रुपये २०००० पेक्षा जास्त आहे.

## ३.१९ कार्डासाठी फी व लागणारे कागदपत्रे

रेशन दुकानदारांकडून कार्डासाठी किती फी आकारली जाते व लागणारी कागदपत्रे कोणती आहेत हे पाहाणे जरूरीचे आहे. हे खालील तक्त्याद्वारे दर्शविण्यात आले आहे.

## तक्ता ३.२२

## नोकरांची संख्या व वेतन दर

| अ. क्र. | कामगार संख्या | वारंवारीता | टक्केवारी | पगार १००० रु पर्यंत | पगार १००० ते २०००रु पर्यंत | पगार ३००० पेक्षा जास्त | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | ६ | ६० | २ | ३ | १ | ६ |
| २. | २ | ४ | ४० | ४ | ४ | — | ८ |
| ३. | ३ | — | — | — | — | — | — |
| ४. | ४ | — | — | — | — | — | — |
| एकूण | | १० | १०० | ०६ | ०७ | ०१ | १४ |

संदर्भ : प्राथमिक माहिती

कागल तालुक्यामधील १० गावांमधील १० दुकानापैकी ६० टक्के दुकानांमध्ये एकच कामगार आहे. तर ४० टक्के दुकानामध्ये दोन कामगार आहेत. यापैकी एक सेल्समन व दुसरा मापाडी असे दोन कामगार असतात. तर एक कामगार असणाऱ्या दुकानात सेल्समन व मापाडी यांचे काम एकच व्यक्ती करत असल्याचे दिसून येते. एकूण कामगारांपैकी १००० पगार मिळणारे ६ कामगार आहेत तर १००० ते २००० पगार मिळणारे ७ कामगार आहेत. ३००० पेक्षा जास्त पगार मिळणारा एक कामगार दिसतो. यावरून असे दिसून येतो की रेशन दुकानात कामगारांना मिळणारा पगार कमी असतो. याचे कारण म्हणजे रेशन दुकानात अधिक नफा मिळत नसल्याने अधिक कामगार कामावर ठेवता येत नाहीत व मोठा पगार देता येत नाही. रेशन दुकानांचा खर्च कमी करून तोटा कमी करण्यासाठी असे केले जाते असे आढळून आले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ठरविण्यासाठी सध्या सर्व्हे करणे जरूरीचे आहे. कारण सद्यस्थितीत आर्थिक परिस्थिती हालाकीची असून सुद्धा दारिद्र्य रेषेखालचे कार्ड नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा योग्य उपयोग कार्डधारकांना होतो असे दिसून येत नाही.

## ३.२२ रेशन धान्याची उचल

सार्वजनिक वितरणात रेशन धान्य दुकाने तालुक्याहून किती माल उचल करतात, कोणत्या कार्डासाठी किती क्विंटल उचल होते यावरून रेशन दुकानांची व्याप्ती समजू शकते.

**तक्ता ३.२४ (अ)**

**रेशन धान्य दुकानासाठी केली जाणारी गव्हाची उचल**

| | केशरी कार्ड | | पिवळे कार्ड | | अंत्योदय कार्ड | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्विंटल रेंज | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी |
| १ ते १० | ९ | ९ | १ | १० | १० | १०० |
| १० ते २० | १ | १ | २ | २० | — | — |
| २० ते ३० | — | — | ४ | ४० | — | — |
| ३० पेक्षा अधिक | — | — | २ | २० | — | — |
| ४० पेक्षा अधिक | — | — | १ | १० | — | — |
| एकूण | १० | १० | १० | १०० | १०० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरील तक्ता केशरी कार्ड, पिवळे कार्ड व अंत्योदय योजनेसाठी गव्हाची महिन्याला होणारी उचल किती क्विंटल होते हे दाखवितो. गव्हाच्या बाबतीत केशरी कार्डावरील उचल १ ते १० क्विं. असणारी ९० टक्के दुकाने आहेत.

८० टक्के रेशन दुकाने आहेत. यावरून तांदळाच्या बाबतीत सुद्धा केशरी कार्डावरील उचल कमी दिसून येते. पिवळ्या कार्डाच्या बाबतीत १ ते १० क्विं. उचल करणारी एकही रेशन दुकान दिसून येत नाही, १० ते २० क्विं. उचल करणारी १० टक्के, २० ते ३० क्विं. उचल करणारी ८० टक्के तर ३० ते ४० क्विं. उचल करणारी १० टक्के रेशन दुकाने आढळून येतात. यावरून २० ते ४० क्विं. उचल करणारी रेशन दुकाने जास्त आढळून येतात. त्यामुळे पिवळ्या कार्डावरील होणारी तांदळाची उचल करणारी अधिक दुकाने दिसून येतात. अंत्योदय योजनेच्या बाबतीत सर्व दुकाने १ ते १० क्विं. च्या आतच उचल करताना दिसून येतात.

## तक्ता ३.२४ (क)

## रेशन धान्य दुकानासाठी केली जाणारी रॉकेलची उचल

| लिटर रेंज | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| १०००-२००० | २ | २० |
| २०००-३००० | ८ | ८० |
| ३०००-४००० | — | — |
| ४००० पेक्षा अधिक | — | — |
| **एकूण** | **१०** | **१०** |

संदर्भ : प्राथमिक माहिती

रॉकेलच्या बाबतीत १००० ते २००० लि. प्रति महिना उचल करणारी १० टक्के रेशन दुकाने होती. २००० ते ३००० उचल करणारी ७० टक्के, ३००० ते ४००० उचल करणारी १० टक्के रेशन दुकाने दिसून येतात. यावरून २००० ते ३००० लि. प्रति महिना उचल करणारी रेशन दुकानांची संख्या अधिक असल्याचे दिसून येते.

पाठीमागे ०.४० पैसे इतका नफा दुकानदारांना होतो. पिवळ्या कार्डवरील गव्हाची खरेदी किंमत रु ४.६५ व विक्री रु ५.०० ने केली जाते, नफा प्रति किलोस ०.३५ पैसे इतका रहातो. तांदळाच्या बाबतीत खरेदी रु ५.६० व विक्री ६.०० रु तर नफा ०.४० पैसे इतका दिसून येतो. अंत्योदय योजनेच्या बाबतीत गहू खरेदी किंमत १.६० रु व विक्री किंमत २.०० रु तर नफा प्रति किलोस ०. ३० पैसे मिळतो. तांदुळ खरेदी रु २.६५ व विक्री किंमत रु ३.०० तर नफा प्रति किलोस ०.३५ पैसे इतका दिसून येतो. रॉकेलच्या बाबतीत खरेदी ९.१८ रु व विक्री रु ९.५८ प्रति लिटर केली जाते तर नफा ०.४० पैसे इतका रहातो. काही ठिकाणी विक्री १० रु. ने केली जाते व सोबत एक काडीपेटी दिली जाते असे आढळून आले. पामतेल प्रति कार्ड एक किलो याप्रमाणे विकले जाते. याचा खरेदी दर ४०.८० रु आहे व विक्री दर रु ४२ प्रति किलो व नफा रु १.२० रु इतका आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता रेशन दुकानाला प्रतिकिलो ३० ते ४० पैसे इतका नफा रहातो असे दिसून येते. जास्तित जास्त वितरण केल्यास जास्तित जास्त नफा प्राप्त होतो.

## ३.२४ स्वस्त/रेशन धान्य दुकानांचा फायदा व तोटा

वितरण व्यवस्थेत रेशन धान्य दुकानांचे महत्व अनन्यसाधारण आहे. मात्र ही दुकाने फायद्यात चालतात का तोट्यात, फायद्यात चालत असतील तर कोणत्या कारणामुळे फायदा होतो आणि तोटा होत असेल तर त्या मागची कारणे कोणती हे तपासून पहाणे आवश्यक आहे. खालील तक्त्याद्वारे फायदा तोटा रक्कम दाखविली आहे.

## तक्ता ३.२६

## स्वस्त/रेशन धान्य दुकानांची वार्षिक उलाढाल

| अ. क्र. | सन | खरेदी (सरासरी) | विक्री (सरासरी) | नफा (सरासरी) | तोटा (सरासरी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | २००३ | ६२४९५२.८५ | ८८७१६३.४४ | २६४०८०.५० | २१७५.०० |
| २. | २००४ | ७७२०४८.८२ | ८३६२८०.०९ | ६८०६६.५७ | ७६७०.०६ |
| ३. | २००५ | ६२९५१२.८८ | ८३५५४६.७७ | २०६८३०.०३ | ४००६.८७ |
| ४. | २००६ | ६०५०२९.०० | ८३२१८१.९५ | २२८०६३.०२ | — |
| ५. | २००७ | ६०५५१६.०४ | ८६३१७८.०९ | २५८७०१.०१ | — |
| एकूण | | ३२३७०५९.५९ | ४२५४३५०.३४ | १०२५७४१.०९ | १३८५१.९३ |

संदर्भ : प्राथमिक माहिती

वरीत तक्त्यानुसार स्वस्त धान्य दुकानांची वार्षिक उलाढाल संशोधनासाठी निवडलेल्या क्षेत्रात सन २००३ ला रु ६२४९५२.८५ सरासरी खरेदी, रु. ८८७१६३.४४ सरासरी विक्री, व सरासरी नफा रु. २६४०८०.५० आणि सरासरी तोटा रु २१७५ इतका होता.

सन २००४ मध्ये रु ७७२०४८.८२ सरासरी खरेदी, रु. ८३६२८०.०९ सरासरी विक्री, व सरासरी नफा रु. ६८०६६.५७ आणि सरासरी तोटा रु ७६७०.०६ इतका होता असे दिसून आले.

सन २००५ मध्ये रु ६२९५१२.८८ सरासरी खरेदी, रु. ८३५५४६.७७ सरासरी विक्री, व सरासरी नफा रु. २०६८३०.०३ आणि सरासरी तोटा रु ४००६.८७ इतका होता असे आढळून आले.

सन २००६ मध्ये रु ६०५०२९.०० सरासरी खरेदी, रु. ८३२१८१.९५ सरासरी विक्री, व सरासरी नफा रु. २२८०६३.०२ इतका होता असे आढळून आले.

सन २००७ मध्ये रु ६०५५१६.०४ सरासरी खरेदी, रु. ८६३१७८.०९ सरासरी विक्री, व सरासरी नफा रु. २५८७०१.०१ इतका आहे असे आढळून आले.

दारीद्र्य रेषेखालील/गरीब कार्डधारकांना योग्य न्याय मिळतो असे दिसत नाही. दारिद्र्याच्या संख्येत वाढ झाली आहे असे दिसून येते. यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल करणे कागल तालुक्यात तसेच संपूर्ण भारतात गरजेचे वाटतें.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.